# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**

ई-मेल: **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in

## जाहीर सूचना

### महाराष्ट्रातील सौर उर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पांचा वीज दर ठरविणे (प्रकरण क्र. २००८/१००)

१. आयोगाने स्वतःहून महाराष्ट्रातील सौर उर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पांच्या वीज दराबाबत प्रारुप आदेश तयार केला असून तो आयोगाच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. या प्रारुप आदेशावर आयोग जनतेकडून त्यांचे लेखी अभिप्राय/सूचना मागवित असून त्या सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई, ४०० ००५,( फॅक्स- ०२२-२२१६ ३९७६; ई-मेल **mercindia@mercindia.org.in** ) या पत्त्यावर त्यांना **१२ मार्च, २००९** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

३. ज्या व्यक्तीस आक्षेप आणि अभिप्राय/सूचना पाठवावयाच्या असतील त्याने त्या इंग्रजी आणि मराठीत, सहा प्रतीत, पाठवाव्यात व त्यावर त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, ई-मेल पत्ता देखील लिहावा. आक्षेप आणि अभिप्राय/सूचना एखाद्या संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गातर्फे करण्यात येत असल्यास, तसे त्यात नमूद करण्यात यावे. त्या पाठविणा-याने आयोगाने त्याचे म्हणणे समक्ष ऐकून घ्यावे अशी इच्छा असल्यास, वरील लेखी निवेदनात तसा उल्लेख करावा. अशा व्यक्तींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी **सोमवार, दिनांक १६ मार्च, २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५, येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात येणा-या जाहीर सुनावणीत** देण्यात येईल व त्यासाठी वेगळी सूचना पाठाविण्यात येणार नाही.

(प्र. बा. पाटील)
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

दिनांक- १३ फेब्रुवारी, २००९